क्र. पोमसं/२३/५४/इंटरनेट संकेतस्थळ/१२८२/२०१५ मुंबई, दिनांक 29/१०/२०१५

**विषय** :- जिल्हा पोलीस दलाकरीता इंटरनेटवर संकेतस्थळ निर्माण करणेबाबत.

*****

**परिपत्रक :-**

राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालये व जिल्हा पोलीस दलाची अद्ययावत माहिती जनतेला सहज उपलब्ध होणे व वरिष्ठ अधिका-यांच्या संपर्काची साधने जनतेस सुलभरीत्या उपलब्ध होण्याकरीता प्रत्येक पोलीस आयुक्तालयाची व जिल्हा पोलीस दलाचे इंटरनेटवर संकेतस्थळ असणे आवश्यक आहे. या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, रत्नागिरी, कोल्हापूर, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, औरंगाबाद ग्रामीण, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, बुलढाणा, वर्धा, भंडारा, लोहमार्ग पुणे या जिल्हा पोलीस दलाचे कोणतेही संकेतस्थळ / वेबसाईट इंटरनेटवर उपलब्ध नाही. तरी या पोलीस अधीक्षक यांनी तात्काळ त्यांच्या जिल्हा पोलीस दलाकरीता मराठी व इंग्रजीमध्ये दोन्ही भाषेत संकेतस्थळ इंटरनेटवर शासकीय डोमेन (Gov.in) वर तयार करुन घ्यावी. संकेतस्थळ तयार करण्याकरीता DIT, महाराष्ट्र शासन व भारत सरकारने वेळोवेळी दिलेल्या गाईडलाईन्सचे पालन करुन तयार करावे. घटक प्रमुखांना याबाबत काही मार्गदर्शन हवे असल्यास त्यासाठी या कार्यालयातील संगणक कक्ष अधिकारी यांच्याशी कृपया संपर्क साधावा.

२. सर्व पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रेस रिलीज, हरविलेल्या व्यक्तींची माहिती व बेवारस मृतदेह या दर्शकाखाली अद्ययावत माहिती, दाखल गुन्हे व पकडलेले आरोपींची माहिती जनतेकरीता दररोज तात्काळ उपलब्ध करुन द्यावी. तसेच प्रत्येक पोलीस आयुक्तालयात / जिल्हयात केल्या जाणा-या ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह कारवाईची माहिती सुध्दा दररोज त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

३. पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांनी त्यांच्या कार्यालयामार्फत माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्जदारास दिली जाणारी माहिती वेबसाईटवर उपलब्ध करुन द्यावी. पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस दलामार्फत केल्या जाणा-या कारवाईची प्रेसनोट दर दिवशी ०७.००, १४.०० व २०.०० वा. संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. राज्य माहिती आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या विरुध्दच्या गुन्हयांची माहिती देखील संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावी.

४. सर्व पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षकांना सूचित करण्यात येते की, वर नमूद सूचनांचे त्वरीत पालन करुन त्याचा पूर्तता अहवाल दि. १०/११/२०१५ पूर्वी पोलीस महासंचालक यांचे अवलोकनार्थ या कार्यालयास न चुकता सादर करावा.

५. सदरचे परिपत्रक www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे.

(प्रभात कुमार) 29/10
विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.)
पोलीस महासंचालक यांचेकरीता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (शहरे / लोहमार्ग)
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हे / लोहमार्ग)

२/-

प्रत.

महासंचालक, ॲसीबी, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह अग्रेषित)

अपर पोलीस महासंचालक, ना.ह.सं./ प्रशिक्षण व खास पथके / वाहतूक /विशेष कृती /द.वि.प./ रा.रा. पो.बल / लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, विसुवि दादर, मुंबई / फोर्स वन, कलिना, मुंबई

विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा. पो.बल, पुणे / नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, गु.अ.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे

विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षलविरोधी अभियान, नागपूर.

संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १४,२०,२१,२२,२४ आणि ३६ (दोन प्रतीत)

संगणक कक्ष अधिकारी, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, मुंबई.

२. अभिलेखासाठी व www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.